दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com | RNI No.MAHMAR/2019/79184
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ९९ वा ▶ मंगळवार दि. १३ फेब्रुवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६



माघी गणेश जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा!

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला
संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### बनपाडाजवळ बस-पिकअपचा अपघात

**नाशिक ।** सुरगाणा-नाशिक बस व पिकअप यांच्यात रविवारी (दि. ११) सकाळी पावणेअकरा वाजता सुरगाणापासून तीन किलोमीटर वरील बनपाडा येथे झालेल्या अपघातात बसचालक व पिकअप चालक जखमी झाले आहेत सुरगाणा- नाशिक बस (एमएच १४ बीटी २५४४) व सुरगाण्याकडे येणाऱ्या पिकअपची (एमएच ०५ बीएच ८५५२) समोरासमोर धडक झाल्याने बसचालक संदीप निकम व पिकअप चालक चंद्रकांत गायकवाड किरकोळ जखमी झाले आहे.

### शेतात आढळला बिबट्याचा मृतदेह

**वावी ।** सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथे कांद्याच्या शेतात बिबट्याचा मृतदेह आढळून आला. शेतात काम करणाऱ्या महिला मजुरांना दुपारी तीन वाजेच्या सुमारास झोपलेल्या अवस्थेत बिबट्या दिसला. त्याला पाहून महिलांची व आजूबाजूच्या शेतामध्ये काम करणाऱ्या मजुरांची धावपळ झाली. हातातली कामे सोडून सर्वजण दूर पळाले. बिबट्या हालचाल करत नसल्याने हिम्मत धरत काही तरुण जवळ गेले असता तो मृत झाल्याचे आढळून आले. याबाबत स्थानिकांनी वावी पोलीस ठाण्यात माहिती दिली.

# अक्कलपाडा योजनेत धुळेकरांची सर्वात मोठी फसवणूक : मा.आ. अनिल गोटे

### २५ ते ३० लाखांची वीज बिलात भर पडणार

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

तापी नदीमध्ये शाश्वत पाणी असतांना पावसाच्या भरवशावर असणाऱ्या अक्कलपाडा योजना तयार करण्यात आली. या योजनेतून नैसर्गिक उताराने पाणी येणार नसून २५० अश्र्वशक्तीच्या पाच विज पंपांचा वापर करावा लागणार आहे. यासाठी २५ ते ३० लाखांची वीज बिलात भर पडणार आहे. अक्कलपाडा योजना ही धुळेकर जनतेची फसवणूक असल्याची टीका आज माजी आमदार अनिल गोटे यांनी केली.

धुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या अक्कलपाडा योजनेची आज पाहणी करण्यात आली. यावेळी माजी आमदार अनिल गोटे यांच्यासह लोक संग्रामचे प्रशांत भदाणे, तेजस गोटे, विजय वाघ यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. धुळेकर जनतेला पाणीपुरवठा करणारी तापी पाणी पुरवठा योजना आणि अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना या तत्वता आणि गुणात्मक काही फरक नाही. तापी पाणी योजनेत पाणी उचलण्यासाठी ४५० अश्र्वशक्ती क्षमतेचे पाच पंप लावण्यात आले आहे. तापी पाणीपुरवठा योजनेतून जामफळ शुद्धीकरण केंद्रापर्यंत २५० अश्र्वशक्तीच्या पंपांच्या मदतीने पाणी आणावे लागते . जामफळ पासुन नैसर्गिक उताराने धुळे शहराला पाणीपुरवठा होतो.

या माध्यमातून अवास्तव खर्च करण्यात आला असल्याची टीका देखील गोटे यांनी केली. या योजनेसाठी १३ फेब्रुवारी २०१९ रोजी तत्कालीन मुख्य अभियंता देवेंद्र लांडगे यांनी १५३ कोटी रुपयांची योजना मंजूर केली होती. या योजनेत अचानक बदल करून २५ जुलै २०१९ रोजी तब्बल वीस कोटी रुपयांनी वाढ करण्यात आली. १७३ कोटी चाळीस लाख एवढी प्रचंड किमतीची योजना तयार करण्यात आली. विशेषता दरवर्षी तीन कोटी ६२ लाख ३१ हजार रुपये डेडरगाव पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी तसेच सात कोटी ६२ लाख ९७ हजार एवढा देखभाल दुरुस्तीचा खर्च तापी पाणी योजनेसाठी गृहीत धरला आहे. यावरून नैसर्गिक उतार म्हणून प्रसिद्धी केलेल्या अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना व तापी पाणी पुरवठा योजना यात काहीही फरक नसल्याचे धुळेकर जनतेच्या लक्षात येईल. वास्तविक पाहता नकाणे तलावाची उंची वाढवणे तसेच डेडरगाव तलावातील गाळ काढून जलशुद्धीकरण केंद्राच्या क्षमता वाढवून उपाययोजना केल्याने धुळेकरांची पाणी समस्या कायमची मिटणे शक्य होते. पण केवळ आर्थिक लाभासाठी अक्कलपाडा योजनेसारखा पांढरा हत्ती पाळण्यात आल्याची टीका देखील यावेळी गोटे यांनी केली.



### अडचणी निर्माण होतील

**तापी नदीमध्ये बारमाही पाण्याचा मोठा साठा उपलब्ध आहे. मध्य प्रदेशात पडलेल्या पावसाचे पाणी देखील तापी नदीच्या बॅरेजमध्ये साठते. त्यामुळे या नदीत शाश्र्वत पाणीसाठा आहे. तर अक्कलपाडा प्रकल्पात साक्री तालुक्यातील प्रकल्पामधील पाणी पांझरा नदीच्या माध्यमातून येते. पावसाने साक्री तालुक्यात पाठ फिरवल्यास अक्कलपाडा प्रकल्पात पाणीसाठा होण्यास अडचणी निर्माण होतील. यातून ही योजना अशाश्र्वत असताना त्यावर कोट्यावधी रुपयांचा खर्च करण्यात आला.**

### एक कोटी दहा लाख रुपये विज बिलाचा भुर्दंड

**या पंपाच्या माध्यमातून दररोज किमान ५० ते ६० एम एल टी म्हणजेच एक ते दीड एम सी एफ टी पाणी आणता येऊ शकते. त्याच्या वीज बिलाच्या साठी दरमहा ८० लाख रुपये खर्च येतो. तर नुकतीच १७३ कोटी रुपये खर्च करून तयार केलेल्या अक्कलपाडा योजनेत २५० अश्र्वशक्तीच्या पाच पंपांपैकी दोन किंवा तीन पंपांच्या माध्यमातून एक एमसीएफटी पाणी मिळते. यातून दरमहा किमान एक कोटी दहा लाख रुपये विज बिलाचा भुर्दंड महापालिकेला बसतो आहे.**

# वृध्द कलावंतांच्या मानधनासाठी शिवसेनेच्यावतीने आंदोलन



**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

वृध्द कलावंतांच्या मानधनासाठी शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेच्यावतीने धुळ्यात टाळ,मृदंगाच्या गजरात आंदोलन करण्यात आले. वृध्दकलावंतांना मानधन मिळण्यासाठी धुळे जिल्हा परिषद यांच्यामार्फत ४ ते ९ जुलै २०२३ या कालावधीत मुलाखती घेण्यात आल्या.

जिल्ह्यातील ४०० वारकरी आणि विविध क्षेत्रातील कलावंतांची मानधनासाठी निवड करण्यात आली. सप्टेंबरमध्ये निवड यादी प्रसिध्दही करण्यात आली. परंतु समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद यांनी तालुक्याच्या पंचायत समितीच्या ठिकाणाहुन निवड झालेल्या कलावंतांचे मानधन त्यांच्या खात्यावर जमा होण्यासाठी कलावंतांची वैयक्तीक माहिती मागविण्यास डिसेंबर २०२३ पर्यंतचा विलंब कालावधी केला आहे. त्यामुळे कलावंत मानधनापासून वंचीत आहे. शासन आपल्या दारीच्या धुळ्याच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदेंच्या हस्ते मानधनासाठी निवड झालेल्या कलावंतांना पात्र लाभार्थी निवड पत्रही देण्यात आले होते. असे असताना प्रशासन अधिकारी, कर्मचारी वृध्द कलावंतांना मानधनाचा लाभ देण्यापासून वंचीत ठेवून सरकारवर रोश कसा वाढेल असेच काम करत आहे. त्यामुळे मानधन लवकर सुरु करावे अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख मनोज मोरे,संजय वाल्हे, हभप अनिल जगताप, शोभा खैरनार, मयुर कुलकर्णी, निंबा बेडसे, यादवराव जाधव, नानाभाऊ वाघ, पांडूरंग माळी, नथ्थू साळूंखे, हिंमत सोनवणे, नानाजी मोहिते, खेमराज पवार आदींनी केले आहे.

# आस्था एक्स्प्रेसवर नंदुरबारजवळ दगडफेक ?

**नंदुरबार । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

सुरतहून अयोध्येकडे जाणाऱ्या आस्था एक्स्प्रेसवर रविवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास नंदुरबार रेल्वे स्थानकाजवळ दगडफेक झाल्याची तक्रार काही प्रवाश्यांनी केली. दुसरीकडे, रेल्वे पोलीस दलाने तपासणी केली असता दगडफेकीचे निशाण आढळून आले नाही. पोलिसांनी अज्ञातांविरोधात तक्रार नोंदवून घेतली आहे.

नंदुरबार रेल्वे स्थानकापासून जवळपास एक किलोमीटरवर दगडफेक झाल्याची तक्रार पोलिसांना प्राप्त झाली होती. त्या परिसरात पोलिसांनी झाडाझडती घेतली. झाडाझुडपात झोपलेले दोन जण आढळून आले. यातील एक नांदेडचा रहिवासी असून तो मद्यपी होता. दुसरा मनोरुग्ण असून त्याला रेल्वे पोलिसांनी पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याने एका पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्याला जिल्हा शासकीय रुग्णालयातील मनोरुग्ण विभागात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, कोणीही बोलण्यास तयार नसल्याने दगडफेक झालीच नसल्याचा दावा पोलिसांकडून केला जात आहे. या प्रकारानंतर नंदुरबार उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन, शहर पोलीस ठाण्याचे राहुल पवार यांनी रेल्वे स्थानकात जावून संपूर्ण घटनेचा आढावा घेतला.

# पाणी मोटर चोरीप्रकरणी तिघे ताब्यात

**पंचवटी । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

नदीतील पाण्याची मोटर चोरी करणाऱ्या तीन संशयितांना जेरबंद करण्यास आडगाव गुन्हे शोध पथकास यश आले असून संशयितांकडून चोरीची मोटर हस्तगत करण्यात आली आहे. या प्रकरणी आडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.लाखलगाव येथील तुषार पाटील, बुवा निरगुडे यांनी शेतीसाठी लाखलगाव शिवार गट नं. ६२६ मध्ये गोदावरी नदीपात्रात पाटबंधारे विभागाच्या परवानगीने जलपरी मोटर लावली होती. ती अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली होती.

# जरांगे पाटलांच्या भूमिकेला समर्थन; धुळ्यात फॉर्म भरो मोहीम

**धुळे । प्रतिनिधी**

मराठा समाजाला तसेच त्यांच्या सग्यासोयर्यांना पितृसत्ताक -मातृसत्ताक पध्दतीने कुणबी संवर्गातून आरक्षण मंजूर झाले पाहिजे, अशा आशयाची मागणी करण्यात आली होती. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने अधिसूचना जारी केली आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचा मार्ग लवकर मोकळा व्हावा म्हणून इतर समाजाकडूनही नाहरकती मागविल्या जात आहेत.

मराठा समाजाने या उपक्रमास कालपासून सुरूवात केली. दत्त मंदिर येथील स्टॉलला धुळेकर नागरिकांनी भेट देत फॉर्म भरून दिले व मराठा आरक्षणाला आपला पाठींबा दर्शविला. या मागणीस राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत यासंबंधीचा मसुदा जरांगे पाटलांकडे सुपूर्द केला होता. त्या मसुद्याचे कायद्यात रूपांतर होणार आहे. त्यादृष्टीने या नाहरकती विचारात घेतल्या जाणार आहेत. याप्रसंगी राजेंद्र काळे, हेमंत भडक, अतुल सोनवणे, वैभव पाटील, मनोज रुईकर, भुषण काळे, सुधाकर बेंद्रे आदींची उपस्थिती होती.



# छगन भुजबळांचे सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांना पत्र

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महाराष्ट्र सरकारने मराठा आरक्षणाचा अध्यादेश जारी केला आहे. कुणबी नोंदी सापडलेल्या सगेसोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय सरकारने घेतला. सरकारने मराठ्यांना कुणबी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या जारी केलेल्या अध्यादेशावर १६ फेब्रुवारीपर्यंत हरकती घेतल्या जातील. त्यानंतर १६ फेब्रुवारीनंतर जीआर लागू करण्याचे विचारात घेतले जाईल, असे अध्यादेशात म्हटले आहे. सरकारच्या या निर्णयाला मंत्री छगन भुजबळ यांनी कडाडून विरोध केला आहे. आता भुजबळांनी सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांना पत्र धाडले आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.४९ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अधिनियम विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास वर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० दि.२६ जानेवारी २०२४ या अधिसूचनेच्या मसुद्याबाबत हरकत नोंदविण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे.

# लवकरच काँग्रेसव्याप्त भाजपा होणार : उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी आपल्या विधानसभा सदस्य पदाचा राजीनामा दिला असून, ते भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. यावर उद्धव ठाकरे यांची प्रतिक्रिया दिली आहे. आदर्श घोटाळा लपवण्यासाठी अशोक चव्हाण भाजपमध्ये जात असावे, असा हल्लाबोल देखील त्यांनी केला.

शिवसेना आणि राष्ट्रवादी निवडणूक आयोगाने चोरांच्या हातात दिली. आता काँग्रेस देखील अशोक चव्हाण यांच्या हातात देणार की काय? असा टोला ठाकरे यांनी लगावला. तर, अशोक चव्हाण यांचा आदर्श घोटाळा लपविण्यासाठी ते भाजपमध्ये गेले की काय असे म्हणत त्यांनी चव्हाण यांच्यावर निशाणा साधला आहे.

॥ सातवे पुण्यस्मरण ॥



हॉटेल नालंदाचे संस्थापक
कै.भाऊसाहेब सुरेश भगवान सुर्यवंशी
(मृत्यू दि. १३/०२/२०१७)

आता सहवास नसला तरी, स्मृति सुगंध देत राहील,
जीवनाच्या प्रत्येक वळणावर, आठवण तुमची येत राहील.
तुमच्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रध्दांजली व सुमनांजली

शोकाकुल
जितेंद्र (मुन्नाशेठ) सुरेश सुर्यवंशी
हेमंत (टिनुशेठ) सुरेश सुर्यवंशी
भाविक मनोज सुर्यवंशी
अदित्य हेमंत सुर्यवंशी
यश मनोज सुर्यवंशी
रिखील जितेंद्र सुर्यवंशी

समस्त सुर्यवंशी परिवार
हॉटेल नालंदा ग्रुप, हॉटेल न्यु नालंदा धुळे,
सर्व हॉटेल कर्मचारी व स्टाफ परिवार

# प्रभाग १९ मध्ये आ.फारूख शाह यांचे हस्ते रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्र.१९ मध्ये रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा आ.फारूख शाह यांच्या हस्ते

शुभारंभ करण्यात आला. प्रभाग क्रं.१९ पठाण गोडावून ते हाफिज रऊफ यांच्या घरापर्यंत रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली होती. यासंदर्भात नागरिकांनी आ.फारुख शाह यांना निवेदन दिले होते. या निवेदनाची आ.फारूख शाह यांनी दखल घेत या कामासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. त्यानुसार आज या रस्ते कामाचा शुभारंभ आ. फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आला.

फाराद जलील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शुभारंभ कार्यक्रमास आ.फारुख शाह यांच्यासमवेत सलीम शाह, नगरसेवक नासिर पठाण, डॉ. सरफराज अन्सारी, मुक्तार अन्सारी, डॉ.दीपश्री नाईक, फातेमा अन्सारी, ईस्माईल अन्सारी, मौलवी शकील, प्यारेलाल पिंजारी, निजाम सैय्यद, छोटू मच्छीवाले, सउद सरदार, हारुण खाटीक, आसिफ शाह, आदींची उपस्थिती होती.



# आरक्षणाची अंमलबजावणी न झाल्यास मराठे कुठे जातील सांगू शकत नाही : जरांगे

**जालना । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी सोमवारी पुन्हा एकदा राज्य सरकारला निर्वाणीचा इशारा दिला. मराठा आरक्षणाची अंमलबजावणी झाली नाही, तर मराठा समाज मुंबईला जाईल की अन्य कुठे हे मी आताच सांगू शकत नाही. हे आंदोलन आता केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून, या प्रकरणी तब्बल १४ राज्य एकत्र येणार आहेत, असे ते म्हणालेत.

मनोज जरांगे यांच्या उग्र आंदोलनानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजातील कुणबी नोंदी आढळणाऱ्या व्यक्तीच्या सगेसोयऱ्यांनाही आरक्षण देण्याचा अध्यादेश काढला होता. पण त्याची अद्याप अंमलबजावणी झाली नाही. मनोज जरांगेंनी या अध्यादेशाची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी शनिवारपासून पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केले आहे.

त्यांनी सोमवारी पत्रकारांशी संवाद साधताना या प्रकरणी सरकारला आरक्षणाची अंमलबजावणी झाली नाही तर पुढे काय होईल हे येणारा काळच सांगेल, असा सूचक इशारा दिला.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आम्ही गाफील राहणार नाही, हे सरकारला माहीत आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाची अंमलबजावणी केली नाही तर महाराष्ट्रात काय होईल ते कळेलच असा इशारा देखील जरंगे यांनी दिला.



### बसता येत नाही, उठता येत नाही

**मनोज जरांगे पाटलांच्या या आंदोलनाला पाठिंबा देण्याकरता काही पीएचडीधारक विद्यार्थीही आंदोलनाला बसले आहेत. त्यांनाही हक्काची नोकरी मिळावी यासाठी त्यांनी हे आंदोलन पुकारले आहे. मात्र, यावरून मनोज जरांगे पाटलांनी त्यांच्यावर संताप व्यक्त केला. तुमची मागणी रास्त आहे, पण तुमच्यापुरता विचार करू नका, समाजाचा विचार करा, असं मनोज जरांगे म्हणाले. मराठा समाजातील गोर गरीब विद्यार्थ्यांचा विचार करा आणि त्यांच्या आरक्षणासाठी अडून राहा, अशी विनंती जरांगे पाटलांनी केली. तसंच, मला आता चालता बोलता येत नाही. मला नीट बसताही येत नसल्याची तक्रार मनोज जरांगे पाटलांनी केली आहे.**

# महागाई आणि अनिश्चितता

अन्न धान्य व खाद्य पदार्थांची महागाई कशी वाढेल किंवा कमी होईल, तसेच युद्धे व अशांतता यांचा परिणाम कसा होईल, हे रिझर्व बँक सांगू शकत नाही. ताज्या पत धोरणावर अनिश्चिततेची छाया जास्त आहे.


रिझर्व बँकेने आपल्या ताज्या पत धोरणात 'रेपो'दर ६.५ टक्क्यांवर कायम ठेवला आहे. बँकेच्या चलनविषयक समितीच्या पतधोरणाच्या सलग सहा बैठकांमध्ये म्हणजे जवळपास वर्षभर मुख्य व्याजदरात बदल झालेला नाही. व्यापारी बँका जेव्हा रिझर्व बँकेकडून कर्ज घेतात त्या वेळी आकारल्या जाणार्या व्याजाच्या दरास 'रेपो'दर म्हणतात. रिझर्व बँकेने व्याजदर वाढवला नाही की, कर्जदारांच्या मासिक हप्त्यात वाढ होणार नाही असे गृहित धरले जाते; मात्र तसे घडेलच याची खात्री नाही. कारण बँकेने आपली 'विड्रॉअल ऑफ ॲकोमोडेशन' भूमिका कायम ठेवली आहे. याचा अर्थ बँक अर्थव्यवस्थेमध्ये जास्त रोख रक्कम टाकणार नाही. जरी 'रेपो'दर कायम ठेवला असला तरी अन्य व्यापारी बँका कर्जावरील व्याजदर वाढवू शकतात, असा त्याचा दुसरा अर्थ होतो. कारण बाजारात रोखतेची चणचण भासत आहे. त्यामुळे कर्जे महाग होत आहेत. महागाई वाढत आहे अथवा ती किमान कमी होत नाही याची कबुली बँकेने दिली आहे. महागाई कमी करण्यावर धोरणाचा भर असला पाहिजे असे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी म्हटले आहे. जर पैसा सहज उपलब्ध झाला तर वस्तूंची मागणी वाढते व त्या बरोबर महागाई देखील वाढते. त्या चक्राला आळा घालण्याचा रिझर्व बँकेचा विचार स्पष्ट दिसत आहे.

विकासाची आशा

बाजारातून सर्वात जास्त रक्कम केंद्र सरकार उचलत असते. त्यांची गरज भागल्यानंतर चलनाच्या बाजारपेठेत किती रोख रक्कम आहे याचा विचार होतो. त्याच्या मागणीनुसार त्यावरील व्याजदर ठरतात. सरकारचा ताळेबंद लक्षात घेता बाजारात जास्त रोखता असल्याचा दावा दास यांनी केला; मात्र काही तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार कधीकधी रोखतेची मागणी व पुरवठा यातील तफावत २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त असते. मोठे उद्योग व व्यवसाय यांना त्यामुळे अल्पमुदतीचे कर्ज घेण्यासाठी जास्त व्याज मोजावे लागते. रोखतेची कमतरता असल्याने बँका सध्या ठेवी गोळा करत आहेत आणि ठेवीदारांना आकर्षित करण्यासाठी अल्प मुदतीच्या ठेवींवर व्याजही जास्त देऊ करत आहेत; पण ते व्याज करपात्र असते हेही लक्षात घेतले पाहिजे. आगामी वर्षात आर्थिक तूट कमी करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. म्हणजेच सरकार बाजारातून कमी कर्ज उचलेल. त्यामुळे बाजारातील रोखतेची स्थिती सुधारण्याची रिझर्व बँकेस आशा आहे; परंतु बँकेस सर्वात जास्त चिंता महागाईवाढीची आहे. गेल्या डिसेंबरमध्ये किरकोळ महागाईवाढीचा दर ५.६९ टक्के झाला, तो नोव्हेंबरमध्ये ५.५५ टक्के होता. रिझर्व बँकेच्या अपेक्षेपेक्षा तो जास्त आहे; मात्र जानेवारी-मार्च या तिमाहीत तो ५ टक्के होण्याची रिझर्व बँकेस आशा आहे. पुढील वर्षात, जर मान्सूनचा हंगाम चांगला गेला तर, महागाईवाढीचा दर ४.५ टक्के राहील असा बँकेचा अंदाज आहे. हा दर दीर्घ काळासाठी ४ टक्के राहावा असे पतधोरणाचे उद्दिष्ट असले पाहिजे असे मत दास यांनी व्यक्त केले आहे. रोखतेची कमी, महागाई व चढे व्याजदर यामुळे मागणी घटली आहे. उपभोगावरील खासगी खर्चाच्या दरात गेल्या वर्षात केवळ ४.४ टक्के वाढ झाली. दुसर्या तिमाहीत ती जेमतेम ३.१ टक्के होती. भारताची अर्थव्यवस्था निर्यातीपेक्षा खासगी खर्च किंवा उपभोगावर अवलंबून आहे. त्यात फार वाढ न होणे हे चांगले लक्षण नाही. ग्रामीण भागातील प्रत्यक्ष वेतनात गेल्या सुमारे दोन वर्षांत २१ टक्के घट झाली आहे. त्याचा परिणाम मागणी घटण्यात झाला आहे. असे असूनही पुढील वर्षात (२०२४-२५) विकासाचा दर ७ टक्के राहाण्याची बँकेस आशा आहे. चालू वर्षी तो ७.३ टक्के असेल. म्हणजे त्यातही थोडी घट शक्य आहे. पहिल्या तिमाहीत ७.२ टक्के, दुसर्या तिमाहीत ६.८ टक्के, तिसर्या तिमाहीत ७ टक्के व चौथ्या तिमाहीत ६.९ टक्के अशी विकासाची गती असमान राहण्याची शक्यता बँकेने व्यक्त केली आहे. एकूण विकासाला चालना देण्यासाठी ताज्या पतधोरणात विशेष उपाय योजना नाहीत. सरकारचा खर्च वाढणार आहे तसा खासगी क्षेत्रानेही गुंतवणूक व खर्च वाढवावा अशी बँकेस अपेक्षा आहे. त्यास कसा प्रतिसाद मिळतो ते बघायचे.

# प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आमचं सेम असतं

प्रेम ही ईश्वराने मानवाला दिलेली खुप मोठी देणगी आहे आणि आयुष्यात खरं प्रेम एकदाच होतं. ईश्वराच्या मनात असते त्यावेळी अचानक त्याला 'ती' आवडु लागते आणि तिलाही 'तो' आवडु लागतो. आनंदाला पारावार राहत नाही. दुनियादारी, भानगडी तेल लावत जातात. आपण एकटेच स्वतःशीच हसतो. जगातले सर्व काही मिळाल्याची भावना तयार होते. एकमेकांशिवाय अजिबात करमत नाही. एकमेकांची खूप खूप काळजी घ्यावीशी वाटते. ह्रदयामध्ये धडधड नेहमीच जोरात चालू होते. एक दिवस बोलणे झाले नाही तरी चुटचुट लागुन राहते. दोघेही जेवल्याशिवाय घास जात नाही आणि दोघेही भेटल्याशिवाय आस जात नाही. तिचा हात हातात घेतल्याशिवाय राहवत नाही. तिचा चेहरा बघितल्याशिवाय चैन पडत नाही. झोप उडते. तिचा चेहरा चंद्रच जणु भासतो. तिच्या सौंदर्याचे वर्णन करताना आपण कवी नसताना सुद्धा आपल्यातला कवी जागा होतो. मग त्या कवितेतून कधी ती चंद्र बनुन येते, कधी ती चांदण्या बनुन येते, कधी चंद्रावरचा डाग तिच्या गालावरचा तिळ बनुन येतो. कधी ती लाल गुलाबच फुल बनुन येते. कधी- कधी तर हदच होते आणि चक्क ती स्वप्नात येते. कोणाला ती जिलेबीसारखी गोड दिसायची म्हणून कोणी तिला जिलेबी म्हणायचं. कोणाला ती गुलाबजाम इतकी गोड हसायची म्हणुन कोणी तिला गुलाबजाम म्हणायचं. कधी अचानक ती बासुंदी भासते. कधी ती वडापावसारखी तिखट पण असते. ती जेवली तरच आपण जेवायचं. ती नाही जेवली तर आपण पण नाही जेवायचं, मग तिने लटक्या रागाने म्हणायचं की 'तु जेवणार आहेस की नाहीये' आणि मगच आपण जेवायचं. कारण तिला त्याचा आणि त्याला तिचा ध्यास लागलेला असतो. कधी कधी तिच्या घरी जी भाजी असते ती आपल्या ही घरी होते.. मग 'सेम-सेम' होतं. कधी कधी तिने मेथीची भाजी बनवली की आपली पण मेथीच असते. तिने गवार बनवली की आपली पण गवारच असते.. मग पुन्हा 'सेम - सेम' होतं. त्याच्या पण पुढं जाऊन काय होतं माहिती आहे? त्याच्या पुढे जाऊन आपल्याला तिच्या हातची भाजी भाकरी लई आवडते. आपण म्हणतो मला तुझ्या हातची भाजी खायची पण ती संधी आपल्याला मिळत नाही. कधी मग सुरू होतं चोरुन-चोरुन भेटणं. तिला भेटायला आपण तब्बल दोन तास अगोदरच येवुन थांबायचं. 'ती' भेटल्यावर आताच आलोय असं सांगायचं. कधी-कधी तिनेही आपल्यासाठी एक तास आधी यायचं आणि भेटल्यावर आताच आलेय अस सांगायचं. बसस्थानकात अशा शेकडो बस तिच्यासाठी सोडायच्या पण तिला नाही सोडायचं. कधी भेट नाही झाली किंवा बोलणं नाही झालं तर उगाचच चुटचुट लागुन राहते. अश्रू अलगद बाहेर येतात. ज्या हाताचा उलटा पंजा डोळ्याला लावायची कधीच आवश्यकता पडली नाही, त्या दिवशी मात्र हाताच्या उलट्या पंजाने अश्रु दुर सारायची गरज खुप भासते. असं म्हटलं जातं की जुने ऋणानुबंध असल्याशिवाय कोणी कोणाच्या आयुष्यात येत नाही म्हणूनच ती आपल्या आयुष्यात आलेली असते. तिच्यासाठी आपण एकादशीचा उपवास धरायचा. मग तिने म्हणायचं माझ्यासाठी उपवास नको धरत जावुस. आपण मात्र शेकडो वर्षे उपवासाच व्रत पाळायचं. प्रेम इतकं नितांत असतं की तिने आठवण काढल्यानंतर आपल्याला उचकी लागतेच आणि आपण आठवण काढल्यानंतर तिला उचकी लागतेच. कधी कधी ठसका पण लागतो. मग नंतर आपण तिला विचारायचं की 'तु माझी आठवण काढली होतीस का?' तिने आश्चर्याने विचारायचं की, 'तुला कसं माहिती?' आपण म्हणायचं, 'उचकी लागली होती ना'. असं हे प्रेम असतं. मंगेश पाडगावकर यांनी म्हटल्याप्रमाणे 'तुमचं आमचं सेम सेम असतं'. ज्यांना आयुष्यात असं झालं त्यांनाच आयुष्यात खरं प्रेम झालेलं असतं. प्रेमाला जात, पात, धर्म, प्रांत, विवाहित, अविवाहित अशा मर्यादा नसतात. अगदी सिमारेषा अर्थात 'लाईन ऑफ कंट्रोल' नसतात. म्हणुनच की काय प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या पलीकडे अर्थात भारतीय लोकांचे पाकिस्तान, बांगलादेशात पण प्रेम झाल्याची जिवंत उदाहरणे आपण पाहिलेली आहेत. कारण



दत्ता पवार
मो.९६५७६०८३३२

प्रेम ही एक निसर्गाने मानवाला दिलेली अनमोल अशी भेट आहे. ती एक पवित्र भावना आहे. प्रेम आयुष्यात एकदातरी करुन बघावं. कोणावर तरी एकदा मरुन बघावं. कोणासाठी तरी आज लवकर निघावं. प्रेम आयुष्यात एकदा तरी करून बघावं. खरं प्रेम आयुष्यात फक्त आणि फक्त एकदाच होतं. म्हणून आपल्या आयुष्यात आलेली माणसं ही काही उगाच आलेली नसतात. तयार होणाऱ्या प्रत्येक गोष्टीमागे आणि नात्यामागं काहीतरी कारण असत. नाहीतर करोडोंची आबादी असणार्या देशात याच व्यक्तीशी आपली ओळख का होते? कोण घडवुन आणतं हे? याचा मास्टर माईंड अर्थात सूत्रधार कोण? याचे उत्तर या जगात कोणीही देऊ शकत नाही.

पण प्रेमाची दुसरी बाजू आपण बघत नाही. या जगात प्रत्येक जण खरं प्रेम करत नसतो. प्रेम करणारे खुप असतात पण ते निभावणारे फारच थोडे मुलं आणि मुली या जगात आपल्याला आढळून येतात. प्रेमाच्या प्रांतात 'सोडून जाणे' हा विषयच नसतो. कारण जी व्यक्ती तुमच्यावर खरं प्रेम करते ती कधीच आपल्या आवडत्या व्यक्तीला दुःखाच्या सागरात सोडू जात नाही. जी व्यक्ती सोडून जाते तिने आपल्यावर खरं प्रेम केलेलं नसतं. ते एक नाटक असतं. ज्यात आपण फसले जातो आणि पर्यायाने बरबाद होतो. जिचं आपल्यावर खरं प्रेम असतं ती व्यक्ती कितीही संकटे आली तरी धरलेला हात कधीच सोडत नाही. जी व्यक्ती धरलेला हात सोडते ती धोकेबाज असते. अशावेळी खुप असह्य मनस्ताप, दुःख, यातना होतात. शेकडो सुर्य उगवले आणि मावळले तरी आठवणींचा एकच सुर्य आपल्या आयुष्यातुन मावळायचे नाव घेत नाही. एखादीनं एखाद्यांवर खुप प्रेम करावं. निदान तसं नाटक करावं. मग त्याला स्वप्न दाखवावीत. त्यानं तिच्यासाठी सर्व काही सोडायला तयार राहावं. तिनं भेटावं. त्यानही भेटावं. त्यानं तिची वाट पाहावी. त्यानं तिच्यासाठी तासभर आधीच यावं. अन म्हणावं आताच आलोय. रात्र-दिवस तिच्या आठवणीत जगावं. तिनं मात्र मन भरल्यानंतर त्याला दुर ढकलावं. त्याच्यावर नाही ते आरोप करावेत. त्याला आरोपीच्या पिंजर्यात उभा करावं. त्याला गुन्हेगार ठरवावं. कुटुंबीयापुढे त्याची मानहानी करावी. त्याच्या ज्या नजरेनं प्रेम दिलं त्या नजरेला खाली पाहायला लावावं. त्याची मात्र तिच्या आठवणीशिवाय दिवस आणि रात्र न व्हावी आणि तिने मात्र विसरून जावं यापेक्षा मोठा घात या जगात दुसरा कोणताही नसतो. कारण ती आनंदी राहते आणि तो जळत राहतो. अस थोड्याच लोकांच्या बाबतीत घडतं. हेच तिचं जगातील सर्वात मोठं पाप असतं. एवढं पाप करुनही तो तिचं सुखच मागतो. पण ईश्वराच्या दरबारात पापाला फळ ही असतातच. धोकेबाज व्यक्ती आपण न केलेल्या चुकांचे खापर आपल्यावर फोडते. आपली मानहानी करते. आपली बदनामी करते. आपल्यालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभी करते. यापेक्षा मोठे दुःख एखाद्याचा आयुष्यात दुसरे असु शकत नाही. ज्या व्यक्तीने आपल्यावर प्रेम करावं किंवा निदान तसं नाटक करावं आणि जन्मभर साथ देण्याची शपथ घ्यावी. अचानक एक दिवस आपल्यावर बेछुट आरोप करावेत. स्वतःच्या कुटुंबियापुढे आपली मानहानी करावी, असे अनेक प्रसंग घडतात आणि यापेक्षा मोठी वेदना नाही, म्हणून तरुण तरुणींनी प्रेम आंधळं असले तरी ते डोळसपणे करावं. कोणावर इतका विश्वास ठेवू नये की आपल्या मनात आत्महत्याच्या विचारांनी घर करावं. कोणामध्ये इतकं गुंतु नये की आपल्याला त्यातुन बाहेर यायचाच विसर पडावा. कोणावर इतके प्रेम करू नये की त्यानं आपल्या भावनांशी खेळुन निघुन जावं. ती सोडुन जाणारी व्यक्ती तिकडे खुश असते आणि आपण ईकडे आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतो. त्यामुळे तरुण-तरुणींनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की प्रेम करणारे खुप आहेत पण निभावणारे खुप कमी असतात. जो आपल्या प्रेमाला सोडुन जातो तो आयुष्यभर पश्चाताप करत राहतो. जाता जाता एकच...जी जीवाच्या पलीकडची नाती तयार होतात. ती जीवाच्या पलीकडे जपावीत.

**(लेखक हे पत्रकार आणि स्तंभलेखक आहेत)**

# साहित्य संमेलनात विचार मंथन कैंव्हा होणार

९७ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन नुकतेच झाले.साने गुरूजींच्या कर्मभूमीत म्हणजे अमळनेर येते हे साहित्य संमेलनाचे सूपही वाजले. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नाही तर समाजाचे उत्थान घडविण्याचे माध्यम आहे.अशावेळी साहित्याने समाजाच्या परिवर्तनासाठी भूमिका घेण्याची गरज आहे.साहित्य जर मस्तके घडवत असतील तर ती मस्तके अधिक सक्षम आणि विवेकी घडविणारे साहित्याची गरज वर्तमानात अधिक अधोरेखित होत आहे.वर्तमानात साहित्य संमेलनाचे आयोजन होत असताना त्या संमेलनाचे स्वरूप गेले काही वर्ष केवळ उत्सवी होते आहे. अशावेळी संमेलनाचे स्वरूपही बदलण्याची गरज आहे.अन्यथा नेहमीच येतो पावसाळा या न्यायाने संमेलनाकडे पाहिले जाण्याचा धोका आहे. येथील संमेलनाकडे रसिकांनी फिरवलेली पाठ अधिक चिंताजनक म्हणायला हवी.


साहित्याने समाजमन घडविण्याची जबाबदारी पार पाडायची असते.साहित्यिक जे लिहितात तो त्यांचा विचार समाजाला दिशा देण्यासाठी अधिक उपयोगी असतो.त्यामुळे साहित्याचा विचार अधिक महत्वाचा आहे.आज आपल्या समाजातील साहित्याचा प्रसार आणि प्रचार करण्याची वेळ आलेली आहे.राज्यातील ग्रंथालय ओस पडली आहेत.शासनाने मान्यता दिलेली असली तरी त्या ग्रंथालयांना वाचकांची प्रतिक्षा आहे. महाविद्यालयातील ग्रंथालयांना देखील तरूणाई प्रतिक्षा आहे. वाचणारी माणसं घटता आहेत हे वास्तव आहे.अशावेळी वाचनारी माणसं नसतील तर मस्तके तरी कशी घडतील ? आज आपल्या समाजात माणसांपेक्षा धर्म आणि जात व पंथ वरचढ ठरू लागले आहेत.माणसं विचाराने एकत्रित येण्याऐवजी जातीच्या नावाखाली एकत्रित येता आहेत. अशावेळी साहित्यांनी घडवलेला मस्तकांची गरज अधोरेखित होत जाते.आज समाजात छोटया छोटया कारणांनी माणसं मारली जात आहेत. माणसांचा जीव अधिक स्वस्त होत आहे. त्यामुळे माणसांचे मोल वाढविणारे आणि माणसाचं जीवन अधिक समृध्द करणारी व्यवस्था उभी करण्याची गरज अधोरेखित होते आहे.समाजात वाचकांचे प्रमाण कमी होते आहे हे वास्तव आहे.न वाचणारी पिढी जेव्हा समोर येते तेव्हा तो समाज रित्या मस्तकाचा असण्याची शक्यता आहे. समाजात जेव्हा हे रितेपण येईल तेव्हा समाजात संघर्षाचे बीजे आपोआप पेरली जाण्याची शक्यता अधिक आहे.समाजाचे रितेपण हे अधिक चिंताजनक आहे.

समाजात लेखकांच्या विचारांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची गरज आहे.लेखकांना विचाराचे स्वातंत्र्य दिले गेले नाही तर वास्तवाचे दर्शन घडविणारे साहित्य प्रसुत कसे होणार हा खरा प्रश्न आहे.जोवर वास्तवाचे दर्शन घडत नाही तोवर प्रश्नाच्या जवळ जाण्याची शक्यता कमी होते.प्रश्नांचा विचार न करता आपला प्रवास सुरू ठेवला तर भविष्याच्या दृष्टीने त्यावर मात करण्याचे शहाणपण कसे निर्माण होणार ? साहित्यिकाचे स्वातंत्र्य स्वीकारले तर उद्याचे प्रश्न दूर करण्याची क्षमता त्यांच्या साहित्यातून निर्माण होईल.त्यामुळे साहित्य वाचकांच्या मनावर अधिराज्य करत असेल तर त्यातून समाजाचे प्रश्न निराकरणाची शक्ती निर्माण होण्यास मदत होते.आज साहित्य संमेलन ही साहित्यिकांची होण्याऐवजी राजकीय पक्षांची होता आहेत का असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे.साहित्यिक व राजकारणी यांच्यात दूरावा असता कामा नये. त्यांच्या नात्यात गोडवा असावा.संमेलनात त्यांचा वावर असावा पण तो किती याचा विचार करण्याची गरज आहे.राजकारणी हे देखील समाजाचे घटक आहेत त्यामुळे दूर सारता येणार नाही.. पण त्यांचा वावर होताना मान्यवर साहित्यिकांकडे होणारे दुर्लक्ष कोणालाच परवडणारे असणार नाही.किमान संमेलनात तरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष झाकला जाणार नाही याची काळजी घेण्याची गरज आहे.

आपल्या समाजातही गेले काही वर्ष साहित्य आणि साहित्यिकांचे मोलही अलिकडे वाटेनासे झाले आहे.साहित्या बरोबर साहित्यिकांचे मोल देखील जाणून घेण्याची गरज आहे. जगाच्या पाठीवर जे जे देश प्रगत आहेत असे आपण मानतो आहोत त्या देशात लेखकांचे मोल अनन्य साधारण आहे.कधीकाळी ब्रिटीश म्हणत असे की,आम्ही हवे ते देऊ पण आम्ही आमचे शेक्सपिअर देणार नाहीत.तेथील सरकारने त्यांची निवासस्थाने जपून ठेवली आहेत. सरकारला लेखक देखील महत्वाचे वाटत आहेत. आपण आपल्या देशात लेखकांचे किती मोल जपतो आहोत हा खरा प्रश्न आहे. आपण साहित्यिकांना सन्मान देण्याची नितात गरज आहे.कधीकाळी आपले राज्यकर्ते साहित्यिकांना सन्मा देत होते.साहित्यिकांच्या व्यासपीठावर न जाता श्रोंत्याच्या समोर खाली बसत होते.यापूर्वी यशवंतराव चव्हाण,विलासराव देशमुखांपासून अनेक राज्यकर्ते साहित्य संमेलनाला जात होते. उस्मानाबाद येथे झालेल्या संमेलनात माजी केंद्रिय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे,तत्कालीन सांस्कृतिक मंत्री अमित देशमुख उपस्थित होते पण ते रसिकांमध्येच बसले होते. अनेक राज्यकर्ते उत्तम वाचक होते आणि आजही आहेत. यशवंतराव चव्हाण यांची साहित्याची जाणही मोठी होती. ते जाणीवपूर्वक साहित्यिकांशी संबंध ठेऊन होते.त्यांनी दिल्लीत गेल्यावर देखील त्यांनी अनेकदा साहित्यिकांसोबत संवाद सुरू ठेवला होता. त्यांनी या मातीतील बऱ्याच साहित्यिकांना उंचीवर नेण्याचे काम केले होते. लेखकाचे स्वातंत्र्य आणि योगदान मान्य करणारे नेतेही या राज्याने पाहिले. एकदा दुर्गाताई भागवत महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना भेटण्यासाठी मंत्रालयात गेल्या होत्या, खरेतर कामही ग्रंथालय चळवळीचेच होते. कक्षात जाताच मुख्यमंत्री जोशी पुढे आले आणि त्यांनी दूर्गाताईंचे वाकून नमस्कार केला तेव्हा कार्यालयात उपस्थितीत असलेल्या सचिवांना धक्का बसला. खरेतर यात मुख्यमंत्री जोशी यांच्याही मनाचा मोठेपणा होता.राज्याच्या सर्वोच्च खुर्चीवर बसलेले असताना देखील दूर्गाताईंचे योगदान लक्षात घेऊन सन्मान करणे हे महत्वाचे. अर्थात त्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी तात्काळ संबंधित सचिवांना बोलावून दूर्गाताईंनी मांडलेल्या विषयावर मार्ग काढण्याचे आदेश दिले. साहित्यिकांचे योगदान आणि निरपेक्षतेचा नेहमी राजसत्तेने आदर केला आहे.ती वाट चालण्याची गरज आहे. संमेलनानी केवळ महोत्सवी विचार आता सोडून देत समाज मन घडविण्यासाठी पावले टाकण्याची गरज आहे. महोत्सवी उत्सव आता खूप होता आहेत किमान संमेलनाच्या माध्यमातून विचार मंथन घडण्याची गरज आहे.

**- संदीप वाकचौरे**

## शब्दकोडे-३१८



**आडवे शब्द :** १. '..... जाईच्या पाकळ्यांस, दंव अजून सलते गं' (सुरेश भट) १०. ब्र ११. हजार किलो १२. मर्यादा, सीमा १३. वस्ती १५. वेशीवरचे ठाणे १६. धपाटा १७. तापापूर्वीचे अंग मोडून येणे २१. आई-वडील २६. सापाची एक विषारी जात २७. प्रतिष्ठित, मान देण्यास योग्य असा २९. अटीची भाषा ३०. खुंटी, मेख, चपटे निमुळते लाकूड ३२. कर्ण, कर्णेंद्रिय ३३. चांगले वर्तन ३५. नमस्कार ३७. खाणे असो की वाचणे असे हवे! ३९. शरीर ४२. डावा ४४. रसभरीत ४६. रेशमी सोवळे ४७. उगीच, नाहक ४९. हाताला धरून पायी-पायी! ५०. गोंजारणे लाडीगोडी लावणे ५३. लहान, छोटा ५४. निमग्न, गुंग ५५. मनाचा ओढा ५६. हंसासारखा एक पक्षी ५८. सोनपिवळा चाफा ६१. धुंदी, नशा ६२. स्पर्शानुसार प्रत दाखवणारा शब्द ६४. बोकड ६५. पांगापांग ६६. विविध, पुष्कळ ६८. दुजाभाव ६९. पूर्वाजन्मातील असल्यास नशीब ७०. रामदासस्वामींचा एक ग्रंथ ७१. मुसलमान ७२. डोळ्यात तेल घालून, खडा (पहारा) ७४. उंटामुळे तंबूतून हद्दपार झालेला ७५. पिकाखाली नसलेली जमीन ७६. कवेत घेणे

**उभे शब्द :** १. धनगर २. चालू कामात अडथळा आणणे याअर्थी वाक्प्रचार ३. टोळभैरवांचे ठाणे ४. तोंडदेखले ५. रम्य, नेत्रसुखद ६. शर्त, पण ७. निबर ८. भोजनाची बासनात गेलेली चांगली योजना ९. सच्छिद्र १४. तपासणी करणारा १८. एकरूप, रममाण १९. मंत्रीमंडळ २०. आईचा भाऊ २२. टक, दृष्टी २३. संगोपन, जपणे २४. मऊ २५. मेहरबानी २८. जेव्हा ३१. अभ्रक आणि गारगोटीसाठी बोलीभाषेतील नाव ३४. गडी माणसे ३६. नारायण जोडला तर दारिद्र्य आणणारी रोकड ३८. जाळणारे, उष्ण ४०. श्रेष्ठ पुरुष ४१. अनाथ, निराश्रित ४२. वाहनांची जा-ये, मालाची ने-आण ४३. अकस्मात, अनपेक्षितरीत्या ४५. नेहमी, अखंड ४६. फूलपुडीत येणारे बिनवासाचे जाड पाकळ्यांचे रंगीत फूल ४८. बतावणी ५१. अस्थिर (संपत्ती) ५२. नाश पावणे ५३. सर्प ५७. उदारहस्ते! ५९. मासलेवाईक ६०. अजूनही हा प्रेमिकांसाठी साक्षीदार! ६१. सात आश्चर्यांमधील भारतीय 'राजमुकुट' ६२. ख्रिश्चनांसाठी सर्वोच्च धर्मगुरु ६३. रत्नजडीत माळ ६४. बीजगणिताचे अंग? ६७. कौशल्य ६८. तपस्या ६९. कुठूनही सोनेच! ७३. कुलूप, मेळ

## शब्दकोडे-३१७ चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.एक वार पंखावरूनी फिरो तुझा हात ११.कथा १२.फाकडा १३.कमळ १५.टीकाकार १७.सालपट १९.सागरगोटे २१.रग २२.रोख २४.रट २६.नगरपाल २७.सलग २८.सरी २९.पायघोळ ३०.घर ३१.टणक ३२.दरडाविणे ३४.तप ३६.रचनाकार ४०.दसरा ४४.लचक ४५.कमालकिमान ४८.लसलस ५१.महाकाय ५२.रवानगी ५४.हार ५५.जमणे ५७.राणी ५८.कात ५९.छान ६०.नाठी ६१.फाटक ६३.कलप्रवास ६५.बेशरम ६८.वडील ७०.हारा ७२.सकटनिकट ७३.वजीर ७६.वानवा ७७.शर ७९.वीर ८०.वसाहत ८२.कणकण ८३.रजत ८४.भान ८५.रडकथा

**उभे उत्तर**
१.एकटी २.कथाकार ३.रफार ४.पंक ५.खडा ६.रुमाल ७.फिकट ८.रोम ९.तुळसा १०.हावरट १४.जमीनदार १६.कागदी घोडे नाचविणे १७.साखरपुडा १८.पडेल २०.गरगट २२.नग २३.कसरत २५.सावकार २८.सकल ३२.दर ३३.विद्यालय ३५.पद ३७.चल ३८.काक ३९.इमारत ४१.सलगी ४२.रास ४३.विसर ४५.कहाणी ४६.माका ४७.नवा ४९.लहानसहान ५०.सांज ५१.मराठी ५३.नवल ५६.महेश ५८.काकडी ५९.छावा ६०.नामकरण ६२.टवटवीत ६४.प्रथा ६५.बेलाशक ६६.रस ६७.शनिवार ६९.लव ७१.रावा ७४.जीवन ७५.रसा ७६.वातड ७८.रण ८१.हर

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# दुष्काळी परिस्थितीने त्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तात्काळ दुष्काळी उपाययोजनांची अंमलबजावणी करा

**मनसेची जिल्हा प्रशासनाने मागणी**

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना नाशिक जिल्ह्यातर्फे काल निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांना दुष्काळी परिस्तिथीने हैराण असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तात्काळ दुष्काळी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबत निवेदन देण्यात आले.



शासनाने जवळपास १५०० महसूल मंडळात अधिकृत दुष्काळ जाहीर केला आहे. खरेतर संपूर्ण महाराष्ट्रभर दुष्काळी परिस्तिती असताना शासनाने दुष्काळी निकषात उर्वरित महसूल मंडळे बसत नसल्याचे कारण देत महाराष्ट्रातील उर्वरित महसूल मंडळात दुष्काळ जाहीर केला नाही. परंतु महाराष्ट्रातील ज्या महसूल मंडळामध्ये अधिकृतपणे दुष्काळ जाहीर झाला आहे त्याठिकाणी दुष्काळ जाहीर होऊन जवळपास दोन महिने उलटूनही अद्यापपर्यंत दुष्काळी उपाययोजनांची अंमलबजावणी झालेली नाही. या गंभीर दुष्काळाच्या परिस्थितीची दखल त्वरित घेण्यात यावी अशी मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली.

यावेळी माजी सैनिकांच्या व मनसेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी मनसे प्रदेश सरचिटणीस अशोक मुर्तडक, प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष ॲड .रतनकुमार इचम, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहर अध्यक्ष सुदाम कोंबडे, जिल्हा उपाध्यक्ष संदिप किर्वे, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष मनोज ढिकले, मनविसे प्रदेश उपाध्यक्ष संदिप भवर, जिल्हा उपाध्यक्ष रमेश खांडबहाले, जिल्हा उपाध्यक्ष मनोज घोडके, सरचिटणीस मिलिंद कांबळे, जिल्हाध्यक्ष महिला सेना वैशाली पोतदार, तालुकाध्यक्ष सिन्नर महिला सेना भाग्यश्री ओझा, निफाड तालुकाध्यक्ष संजय मोरे, सचिन ओझ, तुषार गांगुर्डे, अमित गांगुर्डे, संजय देवरे, शैलेश शेलार, किरण पवार आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. या निवेदनाची जिल्हा प्रशासनाने अतिशय गंभीरपणे दखल घ्यावी व दुष्काळी भागातील केलेल्या उपाययोजनांबाबत त्वरित लेखी स्वरुपात खुलासा करावा अशी मागणी करण्यात आली.

## रविवारी अभिनव वारली चित्रसहल

**नाशिक । प्रतिनिधी**

वारली आर्ट फाउंडेशनतर्फे येत्या रविवार दि. १८ रोजी अभिनव वारली चित्र सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात फक्त १५ जणांना सहभागी होण्याची संधी मिळेल. आदिवासी वारली जमातीची कला, निसर्गस्नेही व पर्यावरणपूरक संस्कृती, परंपरा, राहणीमान यांचा जवळून परिचय व्हावा हा या एक दिवसीय सहलीचा उद्देश आहे.

सकाळी ७.३० वाजता सहलीला प्रारंभ होईल. जव्हार येथील दिव्य विद्यालयाला भेट देऊन नंतर रामखिंड येथे वारली



चित्रशैलीचे प्रात्यक्षिक अनुभवता येईल. दुपारी डहाणू जवळ गंजाड येथे वारली कलाकारांशी संवाद व पद्मश्री जीव्या सोमा मशे यांच्या कलादालनात त्यांच्या चित्रांचा आस्वाद घेता येणार आहे. याबाबत अधिक माहिती व नावनोंदणीसाठी संयोजक संजय देवधर यांच्याशी ९४२२२७२७५५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## भाजप अल्पसंख्यांक मोर्चा नाशिक, दिंडोरी लोकसभा संवाद बैठक संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार व भाजपा नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या उपस्थितीत भाजप अल्पसंख्यांक मोर्चा नाशिक व दिंडोरी लोकसभेतील मुस्लिम बहुल बूथ प्रमुखांची स्नेह संवाद बैठक भाजप कार्यालय वसंतस्मृती येथे पार पडली. यावेळी बोलताना भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी सर्व अल्पसंख्यांक बहुल बुथ वरील मतदानाचा आढावा घेऊन सदर बूथमध्ये अधिकाधिक मतदान भाजपाला कसे होईल या दृष्टीने प्रयत्न करून जास्तीत



जास्त अल्पसंख्यांक समाजापर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या जाणून घेण्यास सांगितले.

याबैठकीप्रसंगी नाशिक महानगराचे अध्यक्ष प्रशांत जाधव, अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री एजाज शेख, प्रदेश उपाध्यक्ष अकबर शाह, डॉ.उमेश काळे, नाशिक लोकसभेचे संयोजक फिरोज (राजू) शेख, दिंडोरी लोकसभा संयोजक जलील अन्सारी, उत्तर महाराष्ट्र विभाग संयोजक मुजमिल सलीम मिर्झा, माजी नगरसेविका शाहिन मिर्झा, नाशिक महानगराचे अल्पसंख्यांक मोर्चाचे अध्यक्ष आरिफ अहमद काझी, नाशिक महानगर अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्षा हिना शेख आदि व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पं.दीनदयाळ उपाध्याय यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सलाऊद्दीन शेख, जावेद (गड्डा) शेख, आयुब काझी, शरीफ खाटीक, नाजीया खाटीक, रुही पठाण, निर्मला खेमनार, इकरा मनियार, रोजमीन पठाण, शाहीन शेख, मुनाफ शेख, अकिल काद्री, मुफद्दल पेंटर, रफिक सैय्यद, आदिल शेख, मनोज टोडरवाल, सिध्दांत बाफना, अ.रहेमान शेख, आसिफ काझी, फारुख काझी, मंडल अध्यक्ष आसिफ मन्सुरी, आलीम काझी, नवाब जहांगीरदार, नाझमा अन्सारी, महेरुनीसा शेख, नगमा पठाण, रुबिना शाह, तोसिफ तांबोळी, दिपक पगारे, रजिया सुलताना, अक्षदा पगारे तसेच नाशिक दिंडोरी लोकसभेतील मुस्लिम बहुल बूथ प्रमुख प्रदेश पदाधिकारी, जिल्हा मंडल पदाधिकारी यांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नाशिक महापालिका कार्यक्षेत्रात भाजपा प्रणित कामगार संघटना स्थापन

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महापालिका कामगारांच्या न्याय हक्कासाठी प्रबळ अशी भारतीय जनता पार्टी प्रणित, महानगरपालिका जनता कामगार संघ हि संघटना स्थापन करण्यात आली असून भाजपा नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक मनपातील महानगरपालिका जनता कामगार संघ या संघटनेचे सदर पदाधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

मनपा कामगारांच्या मागणीनुसार भाजपा नाशिक महानगर अध्यक्ष यांच्या वतीने दिवाळी बोनस व सातवा वेतन आयोगाच्या फरकाबाबत पाठपुरावा करून कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. यापुढेही मनपातील सर्व स्तरातील कामगांराचे मागणी व प्रश्न सोडविण्याचा या



संघटनेचा उद्देश असेल असे भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांनी सांगितले.

भारतीय जनता पार्टी प्रणित, महानगरपालिका जनता कामगार संघटना कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे. त्यात अध्यक्ष - प्रशांत जाधव, माजी नगरसेवक, उपाध्यक्ष - काशिनाथ शिलेदार, सरचिटणीस - जीवन लासुरे, सचिव - योगेश केदार. कार्यकारणी सदस्य - संजय क्षिरसागर, राजु गिते असा समावेश करण्यात आला आहे.

## क्रेडाईतर्फे पेंटिंग कॉन्ट्रॅक्टर यांचे प्रशिक्षण संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

बांधकाम कामगार कौशल्य प्रशिक्षण (स्किलिंग) कार्यक्रमांतर्गत क्रेडाई नाशिक मेट्रो तसेच नाशिक डिस्ट्रिक्ट पेंटिंग कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन आणि रामकृष्ण आरोग्य संस्थां यांच्या संयुक्त विद्यमाने रंगकाम करणाऱ्या बांधकाम कामगारांना बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्फे मिळणारे फायदे तसेच श्रम कार्ड, आयुष्यमान कार्ड आणि कौशल्य विकास या अंतर्गत सर्व पेंटिंग कॉन्ट्रॅक्टर यांच्याबरोबर संवादाच्या कार्यक्रमाचे आयोजन क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे करण्यात आले होते.

शासनातर्फे मिळणारे सर्व फायदे याची माहिती सर्वांना देणे त्यासाठी आपल्या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत या सर्व गोष्टींची माहिती रंग काम करणाऱ्या बांधकाम कामगारांपर्यंत पोहोचावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यासाठी पेंटिंग कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे सभासद आलेले जवळपास शंभराहून अधिक पेंटिंग कॉन्ट्रॅक्टर उपस्थित होते.

क्वालिटी नाशिकचे प्रणेते जितूभाई ठक्कर ,क्रेडाई नाशिक



मेट्रोचे अध्यक्ष कृणाल पाटील, माजी अध्यक्ष उमेश वानखेडे, जॉईन सेक्रेटरी नरेंद्र कुलकर्णी, पेंटिंग कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष संजय धनवट, उपाध्यक्ष पंकज पाटील ,सेक्रेटरी अविनाश कुलकर्णी आणि रामकृष्ण आरोग्य संस्थेचे संदीप कुयटे तसेच सिटीजन फोरमचे सचिन अहिरराव, क्वालिटी कौन्सिलचे शासकीय सेवक आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. जितूभाई ठक्कर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात कौशल्य विकासाच्या वैश्विक स्पर्धा आणि त्यामध्ये कशा पद्धतीने यश मिळवता येते याचे विवेचन केले.

त्यांनी आपल्या कामगारांचे शासनाच्या मदतीने कसे हित जपता येईल, हे सर्व करीत असताना कामाची क्वालिटी ही सुधारेल आणि क्वालिटी नाशिकच्या दृष्टीने तुमच्या सर्वांशी मदतच होईल, शहराच्या सौंदर्यात भर पडेल असे सांगितले.

क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष कृणाल पाटील यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात बांधकाम कामगारांना बांधकाम कल्याणकारी मंडळातर्फे मिळत असणाऱ्या फायद्यांची सविस्तर माहिती सांगितली.

यावेळी माजी अध्यक्ष उमेश वानखेडे यांनीही मार्गदर्शन केले. स्वागतपर भाषणात क्रेडाई नाशिक मेट्रोचे जॉईन सेक्रेटरी नरेंद्र कुलकर्णी यांनी बांधकाम कामगार कल्याणकारी योजना व कौशल्य विकासाच्या या क्रेडाई नाशिकच्या उपक्रमात अधिकाधिक कामगारांची नोंदणी त्यांचे कौशल्य प्रशिक्षण पूर्ण करावे असे आवाहन केले. आभार पेंटिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष पंकज पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन स्वरूपा सुरोशे यांनी केले.

## महावीर इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये आजी आजोबा दिवस साजरा

**लासलगाव ।** येथील श्री महावीर इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये आजी आजोबा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान श्री महावीर जैन विद्यालयाचे कार्याध्यक्ष जव्हेरीलाल ब्रम्हेचा व आयटीआय कॉलेजचे अध्यक्ष मोहनलाल बरडिया यांनी भूषविले.प्राचार्या वैशाली निकम यांनी उपस्थित आजी-आजोबांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका हर्षदा अंभोरे व ज्योती धुमाळ यांनी केले. संस्थेचे कार्याध्यक्ष जव्हेरीलाल ब्रम्हेचा यांनी मुलांच्या जीवनातील आजी-आजोबांचे महत्त्व सांगितले.उपस्थित आजी-आजोबांनी आपले मनोगत व्यक्त करून त्यांच्या बालपणीच्या आठवणी सांगितल्या.यावेळी आजी-आजोबांसाठी विविध मनोरंजक असे खेळ ठेवण्यात आले. कार्यक्रमासाठी इंग्लिश मीडियम चे अध्यक्ष सुनील आब्बड,संस्थेचे मानद सचिव शांतीलाल जैन,जैन प्राथमिक शिक्षण मंदिर चे अध्यक्ष महावीर चोपडा संस्थेचे विश्वस्त अजय ब्रम्हेचा अमित जैन विकास समिती सदस्य राहुल बर्रडिया यांनी शुभेच्छा दिल्या.

## नमो मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



भारतीय जनता युवा मोर्चाच्या माध्यमातून नाशिक पूर्व विधानसभा मतदार संघात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते आरोग्य विज्ञान विद्यापीठ या मार्गावर नमो मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉन मध्ये तब्बल ३००० स्पर्धक सहभागी झाले होते.



१६ वर्षा खालील मुल व्दितीय- गोविंद पाडेकर तृतीय- महेश राजपुत. मुली - प्रथम - स्वप्निला चौधरी तृतीय - वैष्णवी आहेर तृतीय यांनी अनुक्रमे अग्रक्रमावर येण्याचा मान मिळविला. तर खुला गट १६ ते ४०पुरुष गट,विजेते प्रथम - सुजय भामरे द्वितीय - महेंद्र महाजन तृतीय - गोविंद रंगे चतुर्थ - आकाश गावडे पाचवे - कुणाल रामोशी महिला गट प्रथम - फश्या लोभी द्वितीय - साक्षी कसबे तृतीय - ममता भोये यांनी यश मिळविले.

तसेच ४० वर्षां पुढील गट पुरुष प्रथम - सावलीराम शिंदे द्वितीय- अशोक पवार तृतीय - रामदास गडाख. महिला गट प्रथम - सृष्टी शिंदे द्वितीय - अर्चना पाटील तृतीय - वर्षा मुळाणे यांनी यश मिळविले. तर ६० वर्षा पुढीलही गट करण्यात आला होता. या मॅरेथॉनमध्ये ३ हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. यामध्ये पुरुष व महिला असे वेगळे गट करण्यात आले होते.

नाशिक पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार राहुल ढिकले यांच्या हस्ते झेंडा दाखवून व फुगे सोडून मॅरेथॉनची सुरुवात करण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर ज्येष्ट नेते अरुण पवार, माजी महापौर रंजना भानसी, नमो चषकचे संयोजक अमित घुगे, माजी नगरसेवक उद्धव निमसे, प्रियंका माने, राजेंद्र निकम, अशोक दुधारे, सागर शेलार, प्रविण भाटे, प्रशांत वाघ, राहुल कुलकर्णी, धनंजय माने, राहुल पवार, सोमनाथ वडजे, राजू थोरात, ज्ञानेश्वर काकड, एकनाथ पगार, रोहिणी दळवी, मंगला शिंदे, अनिता सोनवणे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

मॅरेथॉनला सुरुवात करताना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर व्यासपीठावर गणेश वंदना करण्यात आली. तसेच झुम्बा डान्स, नृत्य सादरीकरण करण्यात आले. सर्व गटात प्रथम ११११११, द्वितीय७७७७, तृतीय५५५५ रोख बक्षिसे देण्यात आली.

तसेच ५०० रुपये रोख, सन्मानचिन्ह अशी उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आली. तसेच सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले.

५ किलोमीटर व १० किलो मीटर स्पर्धेचा मार्ग ठरवण्यात आला होता. मॅरेथॉन यशस्वीतेसाठी दीपक निकम, आनंद चकोर, सतीश बोरा, शैलेश रकिबे, कुणाल अहिरे, शशीभूषण सिंग, अविनाश वाघ, ऋषिकेश रसाळ, अंकुश सिंग आदींनी परिश्रम घेतले.


## जाहिर नोटीस

१) श्री. विकी उत्तर शेवतकर, रा :- ४ व ८ ची बोळ, कामगार मैदानाजवळ, धुळे. जि. धुळे. २) श्री. गणेश मच्छीद्र सुर्यवंशी, रा :- भुमापन क्र. ४९०/१ पैकी प्लॉट नं. १५, अवधुत नगर, देवपुर, धुळे. जि. धुळे. याना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे पक्षकर सुरेश राजाराम वाघ, रा. भुळ रा रामभाउ दाढीवाले खुट, ग. नं. ५, धुळे. जि. धुळे. ह. भु. :- लेन नं. ३. संत नगर, बालाजी टेडर्स जवळ, लोहगाव, वाघोली रोड, पुणे. जि. पुणे यानी आपणा विरुध्द धुळे येथिल उपविभागीय अधिकारी सो. धुळे भाग धुळे यांचे न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे फेरफार नोंद क्रमांक:- ४३६२७ ही नोंद रद्द होवुन मिळण्यासाठी अपील दाखल केलेले आहे.

सदर अपीलाकामी आपणास मे. उपविभागीय अधिकारी सो. धुळे भाग धुळे यांचे न्यायालयातुन वेळोवेळी आपल्या क्र. १ व २ यांच्या वर नमुद केलेल्या पत्त्यावर नोटीसा काढल्या असता सदर नोटीसा आपणास बजावणी झालेल्या दिसत नाहीत व आपण सदर नोटीसा जाणुनबुजुन बजावणी होवु देत नाहीत असे आमचे निर्देशनास आल्याने आपणास वर नमुद केलेल्या प्रकरणासंबधी माहिती मिळावी याकरिता सदर जाहीर नोटीस देणे भाग झाले आहे.

तरी आपणास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

वर नमुद केलेल्या कारणासाठी अपेलंट सुरेश राजाराम वाघ, रा. पुणे यांनी धुळे येथील उपविभागीय अधिकारी सो. धुळे भाग धुळे यांचे न्यायालयात दाखल केलेले आर. टी. एस. अपील नं. १४/२०२३ चे कामी आपण दोघानी हजर राहुन आपले लेखी म्हणणे स्वतः अथवा वकिलामार्फत भाडाव्यात व ज्या काही आपल्या लेखी हरकती असतील त्या सादर कराव्यात. अशी नोटीस जाहीर झाल्यानंतर , उपविभागीय अधिकारी धुळे यांचे न्यायालयात आर. टी. एस. अपील नं. १४/२०२३ चे कामी हजर होवुन ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत आपल्या हरकती दाखल न केल्यास अपेलटच्या अपीलाकामी आपले काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरून मा. उपविभागीय अधिकारी धुळे हे सदर अपीलाकामी योग्य ते पुढील आदेश पारीत करतील याची आपण नोंद घ्यावी याकरिता सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.

धुळे.
दि.१३/०२/२०२४

जाहीर नोटीस प्रसिद्ध करणार
श्री. सुरेश राजाराम वाघ अपेलट
यांचे करिता

ॲड. सतिष मधुकर देशमुख, धुळे.
ॲडव्होकेट चेंबर नं. १०२, जिल्हा न्यायालय आवार, धुळे.



ॲड.मयुर दि. वानखेडे
नि.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. २ रे सह दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांच्या कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. २५०/२०२४**

१. श्रीमती. तृप्ती ऋषिकेश जोशी
२. श्री. भुषण ऋषिकेश जोशी
३. श्री. दर्शन ऋषिकेश जोशी ....**अर्जदार**

**आणि**

कै. श्री. ऋषिकेश वसंत जोशी .....**मयत**

ज्या अर्थी अर्जदार यांनी वर नमुद मयताचे कायदेशिर वारस या नात्याने शासकिय, निमशासकिय, तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडिल मयताच्या कायदेशिर वारस म्हणुन उपयोगासाठी अर्जदारांच्या नावे हेअरशिप सर्टिफिकेटची मिळावे म्हणुन सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी वर नमुद केल्यानुसार मयताच्या वारसांबाबत हेअरशिप सर्टिफिकेट अर्जदार यांचे नावे देण्यास कोणचीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी दिनांक:- २२/०३/२०२४ रोजी १० वाजता वर निर्दिष्ट केलेल्या कोर्टात स्वतः अगर वकिलांमार्फत हजर राहुन मांडाव्यात अन्यथा यांच्या मागणीप्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट देण्याबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल. आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे** **दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**



ॲड. स्वप्निल सुरेश सोंजे
नि.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं. २६०/२०२४**

कै. शामजी नागो पाटील वगैरे ....**अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही**

(कै. रूख्माबाई राघो पाटील - मयत) वगैरे .....**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि. ८/२/२०२४ रोजी दि. कि. अर्ज नं. २६०/२०२४ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. रूखमाबाई राघो पाटील, कै.राघो धर्मा पाटील, कै. नागो धर्मा पाटील, कै. शामजी नागो पाटील यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.१६/०३/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर कोर्ट नं. ३. यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण - धुळे
दिनांक :- ९/२/२०२४ (शिक्का) आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** **सहाय्यक अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो. व.स्तर, धुळे** **मे.दिवाणी न्यायालय सो. व.स्तर, धुळे**



ॲडव्होकेट सांरग जोशी
नि.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल में. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र.२५१ / २०२४**

श्रीमती सिताबाई कचरूलाल अग्रवाल ....**अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही** ....**जाबदेणार**

कै. कचरूलाल बंडुलाल अग्रवाल ....**मयत**

याअर्थी वरील अर्जदार हे मयत कै. कचरूलाल बंडुलाल अग्रवाल यांचे वारस आहेत कै. कचरूलाल बंडुलाल अग्रवाल यांचे दि. १२/१२/२०२३ रोजी २६३, पदमनाभ नगर, महिला रिमांड होम जवळ, साक्री रोड, धुळे ता.जि. धुळे येथे राहत असतांना निधन झाले असुन अर्जदार यांनी मयत कै. कचरूलाल बंडुलाल अग्रवाल यांचे वारस ठरवुन/घोषीत होवुन तसा वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकामी में.३रे सह दिवाणी न्यायालय सो. कनिष्ठ स्तर, धुळे यांचे न्यायालयात दिवाणी कि. अर्ज क्र. २५१/२०२४ दाखल केला आहे.

त्या अर्थी सदर अर्जाबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारची काही एक तक्रार, हरकत, म्हणणे असल्यास त्यांनी उपराक्त न्यायालयात चौकशी दिनांक १६/०३/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजेला स्वता अगर माहीतगार वकीलांमार्फेत हजर राहुन लेखी हरकत घ्यावी अन्यथा तशी हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन अर्जदार यांच्या लाभात योग्य तो आदेश पारीत होईल व त्यांचा अर्ज मंजुर करण्यात येवुन त्यांना मयत कै. कचरूलाल बंडुलाल अग्रवाल यांचे वारस घोषीत होवुन तसा वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्यात येईल म्हणुन सदर जाहीर नोटीस में. कोर्टाच्या सही शिक्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे
धुळे
दिनांक- ९/०२/२०२४ (शिक्का) आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, धुळे** **दिवाणी न्यायालय क.स्तर, धुळे**

## पॉलिशच्या बहाण्याने दागिने केले लंपास

**धुळे ।** देवपुरातील विद्यानगरी परिसरात प्लॉट नं. १२३ या ठिकाणी किरण प्रभाकर मुळे या राहतात. दुपारच्या वेळी त्यांच्या घरी दोन तरुण आले. दागिने उजळून देण्याचे आमिष दाखवून त्यांनी श्रीमती मुळे यांच्या हातातील सुमारे ५ तोळे वजनाच्या सोन्याच्या पाटल्या घेतल्या. त्यानंतर हातचलाखीने त्या लांबवण्यात आल्या. काही वेळातच दोघे संशयित पसार झाले. दोघे संशयित सुमारे ३० ते ३५ वर्षीय होते. दागिन्यांची किंमत पोलिसांनी अडीच लाख रुपये आकारली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गावठी हातभट्टीवर धाड; १२ हजारांचा माल नष्ट

**शहादा ।**तालुक्यातील सुलवाडा व आमोदा येथे गावठी दारू हातभट्ट्यांवर म्हसावद पोलिसांनी धाड टाकून कारवाई केली आहे. यात मिळालेला माल जागीच नष्ट करण्यात आला आहे. सुलवाडा गावाच्या शिवारात सुलवाडा- टवळाई रस्त्यावर एका पऱ्याच्या शेडवर धाड टाकून दोन हजार ८०० रुपये किमतीची ७० लिटर गावठी हात भट्टीची दारू व इतर साहित्य असा एकूण ११ हजार ८०० रुपये किमतीचा माल पोलिसांनी नष्ट केली. तसेच या प्रकरणी हिरालाल मोरे यास अटक केली. ही कारवाई म्हसावद पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राजन मोरे, पोलिस उपनिरीक्षक जितेंद्र पाटील यांच्यासह पथकाने केली आहे.

# महाराष्ट्र राज्य कापूस उत्पा. पणन महासंघ चेअरमनपदी आ.कुणाल पाटील बिनविरोध





### चेअरमन पदाचा पहिल्यांदाच खान्देशाला मान

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाच्या चेअरमनपदी धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांची आज बिनविरोध निवड झाली. नागपूर येथील संस्थेच्या कार्यालयात झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकित आ.पाटील यांची बिनविरोध निवड घोषीत करण्यात आली. खान्देशातून धुळे तालुक्याचे आ.कुणाल पाटील यांना चेअरमनपदाचा मान मिळाल्याने सर्वत्र आनंद व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान आ.पाटील यांच्या निवडीबद्दल धुळे शहरातील कार्यालयात कार्यकर्त्यांनी पेढे वाटून व फटाके फोडून आनंद साजरा केला.

### धुळ्यात आनंदोत्सव

**महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाच्या चेअरमनपदी धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या रुपाने खान्देशातून पहिल्यांदाच निवड झाल्याने जिल्हयातील आ.पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी धुळे येथील कार्यालयात फटाके फोडून व पेढे भरवून आनंदोत्सव साजरा केला.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकर्यांची जिव्हाळ्याची असलेली संस्था म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ नागपूरकडे पाहिजे जाते. सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या कापूस उत्पादक पणन महासंघाच्या संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच पार पडली. त्यानंतर पणन महासंघाच्या नागपूर येथील कार्यालयात चेअरमन आणि व्हा. चेअरमनपदासाठी दि.१२ फेब्रुवारी रोजी सायं.४ वा.निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी चेअरमनपदासाठी आ.कुणाल पाटील यांचे नाव सर्वानुमते घोषीत करण्यात आले. त्यामुळे आ.पाटील यांची चेअरमन म्हणून बिनविरोध निवड झाली. तर व्हा.चेअरमन म्हणून खामगाव येथील प्रसन्नजीत पाटील यांचीही बिनविरोध निवड झाली.

यावेळी निवडणूक अधिकारी शिंगतकर, नवनिर्वाचित संचालक सुरेश देशमुख,संजय खाडे,प्रफ्फुल मानकर, अनंत देशमुख, शिरीष धोत्रे,धृपतराव सावळे, संजय पवार, पंडीतराव चोखटे,ॲड.विष्णूपंत सोळंके, राजेंद्र केशवे, शिवाजीराव दसपुते,सुरेश चिंचोळकर, राजकिशोर मोदी, श्रीमती उषाताई शिंदे, श्रीमती सुनिता अळसपुरे हे उपस्थित होते. आ.कुणाल पाटील यांची चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर नवनिर्वाचित संचालक मंडळाने त्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. दरम्यान आ.कुणाल पाटील यांच्यासोबत धुळे येथील माजी पं.स.सदस्य पंढरीनाथ पाटील,बाजार समितीचे संचालक विशाल सैंदाणे हे उपस्थित होते.

यावेळी बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, खरेदी विक्री संघाचे चेअरमन लहू पाटील,बाजार समितीचे संचालक साहेबराव खैरनार, उपसभापती योगेश पाटील, विशेष कार्यअधिकारी प्रकाश पाटील, एन.डी.पाटील,रावसाहेब पाटील, प्रकाश पाटील,सुरेश पाटील, खरेदी विक्रीचे व्हा.चेअरमन दिनकर पाटील, भिमसिंग राजपूत, दत्तू पाटील,संदिप पाटील,कृष्णा पाटील, विजय पाटील,संतोष राजपूत,नंदू धनगर,प्रकाश गुजर, ऋषीकेश ठाकरे,सुरेश भिल आदी उपस्थित होते.

# स्वत:च्या सुरक्षिततेसाठी महिलांनी संरक्षण तंत्र आत्मसात करावे

### आंतरराष्ट्रीय कराटे प्रशिक्षक भूषण ओहोळ यांचे आवाहन




**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

स्वसुरक्षा कार्यशाळेचा उद्देश महिलांना त्यांची सुरक्षा आणि आत्मविश्र्वास वाढवण्यासाठी स्व-संरक्षण तंत्राने सक्षम बनवणे हा आहे. त्यासाठी महिलांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी संरक्षण तंत्र आत्मसात करावे. असे आवाहन आंतरराष्ट्रीय कराटे प्रशिक्षक भूषण ओहोळ यांनी महिलांना केले.

जितो संस्थेच्या वतीने बिझनेस बे येथे महिलांसाठी स्व सुरक्षा - महिला स्वसंरक्षण जागृती कार्यशाळेचे आयोजन आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशिक्षित विद्यार्थी आणि शिक्षकांच्या सहाय्याने प्रात्यक्षिकांमधून आंतरराष्ट्रीय कराटे प्रशिक्षक भूषण ओहोळ यांनी महिलांना स्वसंरक्षणाचे धडे दिले. यावेळी ते बोलत होते. या शिबिरात सुमारे ७० महिलांनी सहभाग नोंदविला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा कल्पना पाटणी, मुख्य सचिव वैशाली जैन, मोनालिसा जैन, संयोजक अर्चना शहा, सहसंयोजक श्रद्धा कटारिया, खजिनदार सपना पहाडे, सुनंदा शहा, आरती नहार यांच्यासह जेएलडब्ल्यू टीमचे सदस्य उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षक भूषण ओहोळ यांनी महिलांनी स्वसंरक्षण तंत्राचा जबाबदारीने वापर केव्हा आणि कसा करायचा याचे तपशीलवार स्पष्टीकरण दिले. त्याने प्रशिक्षणाच्या संरक्षणात्मक स्वरूपावर जोर देत स्वसंरक्षण केवळ आत्म संरक्षणासाठी आहे ते आक्रमकतेसाठी नाही असे सांगितले. तसेच जेव्हा कोणी हल्ला करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ओरडणे, हल्लेखोराच्या कमकुवत भागांना लक्ष्य करणे, मनगट लॉक तंत्र, स्कार्फ, चावी किंवा मुठी यासारख्या वस्तूंचा स्व-संरक्षणासाठी शस्त्र म्हणून वापर कसा करायचा याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून प्रशिक्षण दिले. महिलांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी संरक्षण तंत्र आत्मसात करावे. असे आवाहन आंतरराष्ट्रीय कराटे प्रशिक्षक भूषण ओहोळ यांनी महिलांना केले. यावेळी संस्थेच्या मुख्य सचिव वैशाली जैन यांनी नवकार मंत्राच्या जपाने शिबिराचा शुभारंभ केला. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा कल्पना पटनी यांनी सर्व सहभागींचे स्वागत करत स्वसंरक्षण शिक्षणाच्या महत्त्वावर मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय कराटे प्रशिक्षक म्हणून भूषण ओहोळ यांच्या व्यापक अनुभवावर प्रकाश टाकला. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी संयोजक अर्चना शहा, सहसंयोजक श्रद्धा कटारिया, खजिनदार सपना पहाडे, सुनंदा शहा, आरती नहार, मोनालिसा जैन यांनी अथक परिश्रम घेतले.

# शहरात १५ रोजी जिल्हास्तरीय पंडित दीनदयाल उपाध्याय अल्पसंख्याक रोजगार मेळाव्याचे आयोजन

धुळे। धुळे जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांचेकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने थेट नियुक्तीसाठी १५ फेब्रुवारी, २०२४ रोजी जिल्हास्तरीय पंडित दीनदयाल उपाध्याय अल्पसंख्याक रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त राजू वाकुडे यांनी दिली आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धुळे आणि मॉडेल करिअर सेंटर (एनसीएस),आमदार फारुक शहा, धुळे शहर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेस उर्दु ज्युनियर कॉलेज, धुळे फिरदोस नगर, वडजाई रोड,धुळे येथे गुरुवार दिनांक १५ फेब्रुवारी,२०२४ रोजी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत रोजगार मेळावा (प्लेसमेंटचे) आयोजित केले आहे.

# ओम साई मित्र मंडळातर्फे साई भंडारा उत्साहात साजरा


**सिडको । लक्ष महाराष्ट्र वृत्त**




नविन नाशिक परिसरातील त्रिमूर्ती चौक, दिव्या अडॅलब येथे ओम साई मित्र मंडळाकडून साई भंडारा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मंडळाचे हे पहिलेच वर्ष असून देखील परिसरातील नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद या कार्यक्रमाला दिला.

यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हजारोंच्या संख्येने महाप्रसादाचा लाभ परिसरातील नागरिकांनी घेतला.

यावेळी दिलीप खवणे, अमर व्यवहारे, सुनील सोनवणे, अमोल मस्के, गौरव चित्ते, रवींद्र शिंदे, अनिकेत जिटे, अभिजीत बारगजे, हर्षल पवार, शुभम नेरकर आदी मंडळाचे पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# रमाबाई आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती निमित्त ५०० संघर्ष नायिकांना साडी व चरित्र ग्रंथ सस्नेह भेट

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

माजी नगरसेवक गणेश सावळे यांच्या वतीने ७ फेब्रुवारी २०२४ रोजी खालचे गाव बौद्ध वाडा शिरपूर येथे भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहचारिणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षमय जीवन प्रवासात बाबासाहेबांना मोलाची साथ देणाऱ्या रमाईंच्या जन्म जयंती निमित्त प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम माता रमाबाई आंबेडकर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, निशांत रंधे (सचिव कि. वि.प्र.संस्था शिरपूर), के. डी. पाटील (सभापती कृ.उ.बा.स.), माजी नगरसेवक पिंटू शिरसाठ, महिला कल्याण व बालविकास अधिकारी वैशाली निकम, प्राचार्या सारिकाताई रंधे, केशवअण्णा सावळे, प्रा.राजू पवार, बाबूदादा खैरनार, दत्ता थोरात, उजनताई केशव सावळे, सुरेश अहिरे, ड. शालिनी सोनवणे यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी निशांत रंधे होते. माजी नगरसेवक गणेश सावळे यांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. सावित्रीबाई रंधे कन्या विद्यालयाच्या प्राचार्या सारिकाताई रंधे यांनी उपस्थित जनसमुदायास मार्गदर्शन केले. माता रमाई बाबासाहेबांच्या वादळी आयुष्यात न डगमगता सहचारिणी म्हणून उभ्या राहिल्या. कार्यक्रमाची भूमिका व सूत्रसंचालन सुनील बैसाणे यांनी केले. याप्रसंगी आनंदा खैरनार, रोहिदास थोरात, रमेश कढरे, अशोक ढिवरे, रमेश वानखेडे, कल्पनाताई खैरनार, कपिल मोरे, ड.योगेश शिरसाट, बापूसाहेब इंदासे, बन्सीलाल शिरसाट, भटू थोरात, ज्वाला मोरे, प्रा. अरुण पवार, प्रा मंजुळा पवार, प्रा. मुकेश सैंदाणे, सोनाली पवार, प्राचार्य डॉ. सरोजबाला महिरे, प्रा.रंजना बैसाणे, अनिल महिरराव, पनीराज बैसाणे, अनिल आखाडे सर्व स्तरातील प्रबुद्ध नागरिक उपस्थित होते.

# अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना केले बँकिंग विषयी मार्गदर्शन

**शिरपूर ।** तालुक्यातील गरताड येथे आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालयात स्टेट बँक अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना बँकिंग मार्गदर्शन केले. भारतीय स्टेट बँके शाखा शिरपूरचे कर्मचारी चेतन मुसळे म्हणाले, शालेय जीवनापासूनच आर्थिक साक्षरता रुजविण्याच्या दृष्टीने पैशांचे नियोजन केले पाहिजे. त्याचप्रमाणे भविष्यासाठी गुंतवणूक कशी फायदेशीर ठरते व बँकांचे जे व्यवहार आहेत ते कशा प्रकारचे असतात त्यांची माहिती तसेच कर्ज आणि व्याज प्रणाली याविषयीची माहिती, आर्थिक व्यवहाराकरता यूपीआय जे आधुनिक साधने व ऑनलाईन कार्यप्रणाली आहेत. या साधनांचा वापर करताना आपण कोणती काळजी घेतली पाहिजे. याबाबत भारतीय स्टेट बँके शाखा शिरपूरचे कर्मचारी चेतन मुसळे यांनी मार्गदर्शनपर व्याख्यानातून या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांसमोर मांडून मार्गदर्शन केले.

# घरकुल परिसरातील समस्यांचे निवारण न झाल्यास आंदोलन : पाटोळे

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



घरकुल परिसरातील समस्यांचे निवारण न झाल्यास मनपा विभागीय कार्यालयावर आंदोलन काढण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत पाटोळे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

गेल्या वर्षभरापासून चुंचाळे परिसरातील घरकुल इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांन विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यासंदर्भात वेळोवेळी मनपा अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना या समस्यांची जाणीव करून दिली. तरी देखील समस्या सुटण्याचे नाव घेत नाही. या विविध समस्यांमुळे येथील नागरिकांना येथे राहणे अवघड झाले असून त्यांसंदर्भात मोठ्या प्रमाणात तक्रार आता प्राप्त होऊ लागल्या आहेत.

चुंचाळे परिसरातील घरकूल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलनीत दोन इमारतींचे चेंबर फुटून त्यांचा सांडपाण्याचा विसर्ग होत नाही. ते सांडपाणी ईमारत क्रमांक २१ आणि २३ या समोर जमा होत आहे. यामुळे दुर्गंधी व डासाचे प्रमाण वाढले आहे. सदर चेंबर लवकरात-लवकर दुरुस्त करावे अशा मागणीचे पत्र मनपा अधिकारी यांना देण्यात आले आहे. यावेळी सामजिक कार्यकर्ते चंद्रकांत पाटोळे, राजू शेळके, शुभम पाटोळे, सार्थक लोहार, महेश कांबळे आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोरकुंड येथे भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू लेन्सचे शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

**बोरकुंड । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

श्रीराम मंदिर बोरकुंड येथे शारदा नेत्रालय धुळे,रामदेवजी मेडिकल बोरकुंड,रोटरी क्लब ऑफ धुळे,श्रीराम नवमी उत्सव समिती बोरकुंड यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू लेन्सचे शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन रोटरी क्लब ऑफ धुळेचे प्रेसिडेंट दीपक जैन व सेक्रेटरी विलास कोठावदे यांच्या टीमने केले.

या शिबिरात ३००हून अधिक गरजूची नेत्र तपासणी केली त्यात १३५ रुग्णांचे मोतीबिंदू आढळून आले त्यांच्यावर निशुल्क मोतीबिंदू शस्त्रक्रिया शारदा नेत्रालय धुळे येथे करण्यात येणार आहे.त्यापैकी राहिलेले ६० अधिक रुग्णांची फेर तपासणी व इतर चाचण्या करण्यासाठी शारदा नेत्रालय धुळे येथे टप्प्याटप्प्याने बोलवण्यात आले आहे व काही तपासणी धारकांना औषधोपचार करण्यात आले. या शिबिराचे आयोजन बोरकुंड येथील भाजपाचे पदाधिकारी जितेंद्र जैन बंब यांनी सालाभादाप्रमाणे या वर्षीही केले होते. शिबिर यशस्वीरीत्यासाठी दीपक घोडके, डॉ.अनिल पाटील, आप्पा मिस्तरी, भरत सोनवणे, अनिल कुंभार, इजि.हेमंत रावसाहेब बाफना, रावसाहेब माळी, भगवान कासार,अर्जुन नाईक, गोरख माळी, मुरलीधर अहिरे, गोपी आहिरे, अनिल भदाणे, गंगाधर वाघ,शांतीलाल माळी व ग्रामस्थ यांनी सहकार्य केले. प्रत्येक तपासणी करणाऱ्या रुग्णाला एनर्जी ड्रिंक चे वाटप करण्यात आले. ज्या रुग्णांकडे जाणे येण्यासाठी भाडे नसेल त्याची व्यवस्था आयोजक करणार आहेत,अशी माहिती जितेंद्र जैन बंब यांनी दिली.

# मुंबई किकबॉक्सर्सचा जागतिक स्तरावर विजय

### आंतरराष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये नऊ पदके पटकावली

**मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त**






मुंबईच्या किकबॉक्सिंग खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय मंचावर आपले पराक्रम दाखवून, ३ऱ्या ओपन इंटरनॅशनल किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२४, केडी जाधव इनडोअर हॉल, दिल्ली मध्ये प्रभावी नऊ पदके जिंकली. उमेश मुरकर व विघ्नेश मुरकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली भारताचे प्रतिनिधित्व करताना ३ सुवर्ण पदके, २ रौप्य पदके आणि ४ कांस्य पदके पटकावत संघाने एक उत्कृष्ट कामगिरी केली.

या प्रतिष्ठित चॅम्पियनशिपमध्ये इराक, तुर्की, सिंगापूर, नेपाळ, ग्रेट ब्रिटन, कझाकिस्तान, उझबेकिस्तान आणि अर्थातच भारतासह २८ देशांचा सहभाग होता. किकबॉक्सिंग संघाचे वाको इंडियाचे अध्यक्ष संतोष अग्रवाल आणि वाको महाराष्ट्राचे अध्यक्ष नीलेश शेलार यांच्याकडून त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन केले. सदर यशोगाथा एस एस के के ए संस्था आणि गुरुकुल कृती फाउंडेशन ट्रस्टच्या पाठिंब्याने रचली गेली, ज्यांनी समर्पित खेळाडूंना विस्तृत प्रशिक्षण आणि साहित्य प्रदान करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आलोक ब्रीद एमडी कॉलेज, परळ, विन्स पाटील सिद्धार्थ कॉलेज बदलापूर, अश्र्विनी जांबळे -एसआयईएस ग्रॅज्युएट स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी, नेरूळ, दुर्वा गावडे -ग्लोरिया कॉन्व्हेंट हायस्कूल, यथार्थ बुडमला - पीपल वेल्फेअर हायस्कूल, सायन आणि सिद्धत गुप्ता अवर लेडी गुड काउंसिल हायस्कूल, सायन आशिष महाडिक श्रीराम कॉलेज, बदलापूर यासारख्या उल्लेखनीय शैक्षणिक संस्थांमध्ये शिकत आहेत. स्पोर्ट्स किक बॉक्सिंग असोसिएशन मुंबई शहर चे अध्यक्ष उमेश मुरकर यांनी खेळाडूंना शुभेच्छा देत अजून चांगला सराव व सातत्य राखण्यास सांगितल.

**सुवर्ण पदक विजेते :** आलोक ब्रीद (दुहेरी पदक - पॉइंट फाईट आणि लाइट कॉन्टॅक्ट), विन्स पाटील (लाइट कॉन्टॅक्ट)

**रौप्य पदक विजेते :** दुर्वा गावडे आणि अश्र्विनी जांबळे (लाईट संपर्क)

**कांस्य पदक विजेते :** यथार्थ बुडमाला (दुहेरी - पॉइंट फाइट आणि लाइट कॉन्टॅक्ट), दुर्वा गावडे आणि अश्र्विनी जांबळे (पॉइंट फाइट)

**सहभागधारी :** सिद्धांत गुप्ता व आशिष महाडिक

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात फिरत्या प्रयोगशाळेतून विज्ञान जागृती

**पिंपळनेर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

येथून जवळच भोनगाव येथे उत्तमराव पाटील महाविद्यालय दहिवेल चे रा से यो शिबीराच्या तिसऱ्या दिवशी क.ब.चौ.उमवी जळगाव येथील फिरती मोबाईल प्रयोगशाळा च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयी जाणीव जागृती करण्याच्या सूचना कुलगुरू प्रा डॉ व्ही एल माहेश्र्वरी यांनी विद्यापीठाच्या फिजिकल सायन्स डिपार्टमेंट ला दिल्या त्यानुसार प्रा डॉ एस टी बेंद्रे व प्रा डॉ संजय घोष यांच्या नेतृत्वात ही मोबाईल प्रयोगशाळा व्हॅन विविध शाळा व महाविद्यालयात विज्ञान विषयक प्रयोग सादर करत भोनगाव येथे उत्तमराव पाटील महाविद्यालयाच्या रा से यो शिबिरात पोहचले यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ आर आर अहिरे,क ब चौ उमवी रा से यो चे संचालक प्रा डॉ एस जे नांद्रे,प्राचार्य डॉ एस सी अहिरे,प्रा प्रीतम तोरवणे, प्रा डॉ संजय गवळी उपस्थित होते. कार्यक्रमचे प्रास्तविक प्रा डॉ एस जे नांद्रे यांनी केले तर परिचय प्रा शिवप्रसाद शेवाळे यांनी केला तर सूत्रसंचालन प्रा डॉ श्रीमती वंदना पाटील यांनी केले तर आभार प्रा डॉ वाय जे कोरडे यांनी मानले.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# अक्कलपाडा योजनेत धुळेकरांची शंभर वर्षातील सर्वात मोठी फसवणूक : गोटे

## पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईनला आताच किमान ७ ठिकाणी गळती













धुळे । धुळे

शहराला अक्कलपाडा धरणातून येणारे पाणी हे नैसर्गिक उताराने नव्हे तर, २५० अश्वशक्तीच्या ५ पंपानी येते, तापी पाणी पुरवठा योजना व अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना यात तत्वत: व गुणात्मक फरक नाही. तापी पाणी पुरवठा योजनेचे दर महा ८० लाखांचे बिल अदा करावे लागते. पण आता अक्कलपाडा योजनेचेही दर महिन्याला २५ ते ३० लाखांची नवीन भर पडली आहे. अक्कलपाडा योजना नैसर्गिक उताराने नव्हे तर विजेवर कार्यरत असून तरी देखील नैसर्गिक उताराचा खोटा दावा केला जात आहे. धुळेकर जनतेची ही शंभर वर्षातील सर्वात मोठी फसवणूक असल्याचे माजी आ.अनिल गोटे यांनी म्हटले आहे. यासंदर्भात अनिल गोटेंनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, धुळे शहराला पिण्यासाठी नियमित पाणी मिळावे यासाठी अक्कलपाडा प्रकल्पामध्ये ४०० एम.सी.एफ.टी. पाण्याचा साठा राखीव ठेवला आहे. सदर पाणी धुळेकरांना मिळावे यासाठी तब्बल १७३ कोटी रूपये खर्चाचा अंदाज व्यक्त करून सदर योजनेचे काम हाती घेण्यात आले. पाणी उचलण्याकरीता ४५० अश्वशक्ती क्षमतेचे पाच पंप लावले आहेत. सदर पंपातून रोज किमान ५० ते ६० एम.एल.टी. म्हणजे एक ते दीड एम.सी. एफ.टी. पाणी आणता येऊ शकते. त्यासाठी विज बिलाचे दरमहा ८० लाख रूपये खर्ची पडतात. तर १७३ कोटी रूपये खर्च करून २५० अश्वशक्तीच्या लावलेल्या पाच पंपापैकी २ किंवा ३ पंपावरून १ एम. सी. एफ. टी. पाणी मिळते. म्हणजे दर महाकिमान १ कोटी १० लाख ते १ कोटी २० लाख रू विज बिलापोटी पालिकेला भुर्दंड बसतो.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक

मंगळवार दि. १३ फेब्रुवारी २०२४





# नाशिककरांसाठी राज्यातील पहिल्याच वातानुकूलित बसस्थानकाचे लोकार्पण

## कुंभमेळ्यासाठी निधी कमी पडू देणार नाही : उपमुख्यमंत्री फडणवीस













नाशिक।

आगामी २०२७ मधील सिंहस्थ कुंभमेळ्याचा आराखडा आताच तयार करून पाठवून द्या. यासाठी जुलैतील अर्थसंकल्पातच त्यासाठी तरतूद करण्यात येईल. कुंभमेळ्यामुळे नाशिक व त्र्यंबकचा चेहरामोहरा बदलणार असून त्यासाठी कोणताही निधी कमी पडू दिला जाणार असे आश्र्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. शनिवारी सायंकाळी ते राज्यातील पहिल्या वातानुकूलित बसस्थानकाच्या नाशिक येथील लोकार्पण सोहळ्यानंतर बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री दादा भुसे, खा. हेमंत गोडसे, आ. देवयानी फरांदे, आ. सीमा हिरे, आ. राहूल ढिकले, आ. राहुल आहेर, माजी महापौर सतीश कुलकर्णी, मनपा आयुक्त अशोक करंजकर, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलतांना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०१९ च्या मनपा निवडणुकीत घोषणा केली की, मी नाशिकला दत्तक घेतो. परंतु त्यांनतर दोन वर्ष मला विरोधी पक्ष नेता व्हावे लागले. तरीही आज झालेल्या कामांपैकी ७० टक्के निधी मी मुख्यमंत्री असतांनाच मंजूर झाल्याचे सांगितले. आगामी कुंभमेळ्यात नाशिक नगरीत गेल्या सिंहस्थापेक्षा दुप्पट लोक येतील, त्यामुळे त्या दृष्टिने तयारी करण्याची गरज आहे. मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने कुंभमेळ्यासाठी लागणाऱ्या निधीचा प्राथमिक आराखडा तयार करावा. येत्या जुलैमध्ये होणाऱ्या अर्थसंकल्पातच त्याची तरतूद करून देऊ. शहराच्या विकासासाठी महत्वाचा असणारा रिंगरोडबाबतही लवकरात-लवकर निर्णय घेऊन शासनाला कळवा असेही फडणवीस यांनी सांगितले.